क्रमांक: महानिर्मिती/मासं-सेप्र/ 05167 दिनांक: 24 MAY 2019

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## "रसायनशास्त्रज्ञ" (Chemist)" या पदाच्या ऑनलाईन व वैयक्तिक मुलाखत परीक्षेअंती अंतिम निवड झालेल्या उमेदवारांची सुधारीत यादी.

संदर्भ:- १) महानिर्मिती कंपनीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली अधिसुचना दि.२८.११.२०१८
२) महानिर्मिती कंपनीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली अधिसुचना दि.३०.११.२०१८
३) महानिर्मिती कंपनीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली अधिसुचना क्र.१४५७२ दि.२०.१२.२०१८
४) महानिर्मिती कंपनीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली अधिसुचना क्र.१४५७३ दि.२०.१२.२०१८
५) महानिर्मिती कंपनीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली अधिसुचना क्र.१००५ दि.२५.०१.२०१९
६) मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर येथे दाखल रिट याचिका क्र.८६८९/२०१८
७) महानिर्मिती कंपनीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली अधिसुचना क्र.महानिर्मिती/मासं-सेप्र/११२९ दि.३०.०१.२०१९
८) महाराष्ट्र शासन शुध्दिपत्रक क्र.सेकीर्ण-१११८/प्र.क्र.३९/१६-अ दि.१९.१२.२०१८
९) महानिर्मिती पत्र क्र.महानिर्मिती/मु.व्य.(से.प्र./मासं) /२११३ दि.२१.०२.२०१९
१०) उपसचिव(सा.प्र.वि),महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.संकीर्ण १११९/प्र.क्र.८८/१६-अ दि.१६.०३.२०१९
११) मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांचा रिट याचिका क्र.९२/२०१९ मधील आदेश दि.०१.११.२०१८

---

उपरोक्त विषयास अनुसरुन महानिर्मिती जाहिरात क्र. ०१(जाने)/२०१७ अन्वये "रसायनशास्त्रज्ञ" (Chemist) यांची पदे सरळसेवेने भरणेबाबत जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. सदरील जाहिरातीच्या अनुषंगाने ऑनलाईन परीक्षा व वैयक्तिक मुलाखतीत प्राप्त गुणांनुसार तात्पुरती निवड / प्रतिक्षा यादी दि.१९.०७.२०१७ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती.

तद्नतंर मा. मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर, यांनी याचिका क्र.४००३/२०१७ प्रकरणी दिलेल्या आदेशानुसार ऑनलाईन परीक्षेतील सुधारित गुणांची यादी संदर्भिय अधिसुचना क्र.०१ अन्वये प्रसिध्द करण्यात करण्यात आली होती. सदरील सुधारित गुणांच्या यादीनुसार वैयक्तिक मुलाखतीस पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी संदर्भिय अधिसुचना क्र.०२ अन्वये प्रसिध्द करण्यात करण्यात आली होती. सदरील यादीनुसार उमेदवारांची वैयक्तिक मुलाखत परीक्षा व कागदपत्रे पडताळणी प्रक्रिया पार पाडण्यात आली होती. तसेच त्यानुसार पात्र व अपात्र उमेदवारांची यादी संदर्भिय अधिसुचना क्र.०५ अन्वये प्रसिध्द करण्यात करण्यात आली होती.

महानिर्मिती कंपनीच्या संदर्भिय जाहिरातीच्या अनुषंगाने घेण्यात आलेल्या ऑनलाईन परीक्षेत उमेदवारांना १७८ गुणांपैकी (०१ प्रश्न बाद ठरविल्यामुळे) प्राप्त झालेल्या गुणांचे ८९ गुणांमध्ये व वैयक्तिक मुलाखतीत प्राप्त गुणांचे १० गुणात रुपांतर करुन अशी एकूण ९९ गुणांच्या आधारे तसेच समांतर आणि सामाजिक आरक्षण विचारात घेऊन अंतिम निवड झालेल्या उमेदवारांची यादी तयार करुन संदर्भिय अधिसूचना क्र.०७ अन्वये प्रसिध्द करण्यात आली होती.

सदरील यादी तयार करतेवेळी समांतर आरक्षणाची पदे निवडीसाठी महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही १०-१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ दि.१३.०८.२०१४ मधिल नमूद तरतूदी विचारात घेण्यात आल्या होत्या. तथापि, सदरील बाबींस काही उमेदवारांनी आक्षेप घेतल्याने सदरील प्रकरणी महाराष्ट्र शासनाकडून मार्गदर्शन प्राप्त करण्यात आले. सदरील मार्गदर्शनानुसार समांतर आरक्षणाची पदे निवड करताना महाराष्ट्र शासन शुध्दिपत्रक क्र.सेकीर्ण-१११८/प्र.क्र.३९/१६-अ दि.१९.१२.२०१८ नुसार निवड यादी तयार करणे आवश्यक असल्याने खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून अंतिम निवड झालेल्या उमेदवारांची सुधारीत यादी तयार करण्यात आलेली आहे.

१) महानिर्मिती प्रशासकीय परिपत्रक क्र.४०० दि.२३.०१.२०१८ अन्वये नमूद तरतूदीनुसार "रसायनशास्त्रज्ञ" (Chemist) या पदाची निवड यादी तयार करताना एकुण प्राप्त गुणांसाठी खुल्या प्रवर्गातील (Open Category) उमेदवारांच्या निवडीकरीता ४० गुणांचा व मागास प्रवर्गातील (Backward Class) उमेदवारांच्या निवडीकरीता ३० गुणांचा, निकष लावून त्याआधारे सदरील सुधारीत यादी तयार करण्यात आलेली आहे, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

..२/-

२) मा.उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्र.८६८९/२०१८ (श्री.प्रणव मंडल विरुध्द महानिर्मिती कंपनी) प्रलंबित असल्याने सुधारीत अंतिम निवड यादी तयार करताना खुल्या प्रवर्गाचे एक पद सदरील रिट याचिकेतील आदेशाच्या अधिन राहून रिक्त ठेवण्यात आले आहे.

३) "रसायनशास्त्रज्ञ" (Chemist) या पदाची सुधारीत निवड यादी घोषित करताना सर्व प्रकारची काळजी घेण्यात आलेली आहे. तथापि, अनावधनाने किंवा मुद्रण दोषामुळे झालेल्या चुका सुधारीत करण्याचा अधिकार महानिर्मिती कंपनीने राखून ठेवलेला आहे.

४) "रसायनशास्त्रज्ञ" (Chemist) या पदाची निवड यादी ही घोषित केल्याच्या तारखेपासून ०१ वर्षाकरीता वैध असेल.

५) जाहिरात क्र. ०१ (Jun)/२०१७ च्या भरती प्रक्रियेचा अभिलेख निकाल घोषित केल्याच्या दिनांकापासून तीन (३) महिन्याच्या कालावधीसाठी जतन करण्यात येईल. त्यापुढील काळात कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही,याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

६) अयशस्वी उमेदवारांनी कोणत्याही प्रकारचे पत्रव्यवहार महानिर्मिती कंपनीकडे करु नये. उमेदवारांच्या कोणत्याही पत्र व्यवहाराची महानिर्मिती कंपनीकडून दखल घेतली जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

ऑनलाईन व वैयक्तिक मुलाखत परीक्षेअंती अंतिम निवड झालेल्या उमेदवारांची सुधारीत यादी प्राप्त करुन घेण्यासाठी उमेदवारांनी खालील ठिकाणी क्लिक ↵ करावे.

| **"रसायनशास्त्रज्ञ" (Chemist) या पदाची अंतिम सुधारीत निवड यादी.** ↵ |
|---|

(विनोद बोंदरे)
कार्यकारी संचालक (मासं)
महानिर्मिती